

शेतकरी उत्पादन कंपनी तर्फे भूईमुगाची विक्री केल्यामुळे कानस्लोनिया गावातील जीवनभाई सारख्या अनेक शेतकऱ्यांना फायदा झाला.

सामुहीकतेची ताकद

Jasbir sandhu and Rajesh sharma.

समावेशक, शास्वत व विस्तारण्या योग्य मूल्यवर्धन मॉडेलच्या दिर्घ अनुभवातून गुजरात मधील शेतकऱ्याना सामुहिकतेतील शक्तीची जाणीव झाली आहे. बाजारातील त्यांच्या थेट सहभागामुळे शेतमालाच्या किंमतीच्या वाटाघाटी करण्याची ताकत त्यांच्यामध्ये निर्माण झाली.

'कानस्लोलिया' हे गुजरातच्या राजकोट जिल्ह्यातील जसादान तालुक्यातील छोटेसे गाव एकून ३७२ कुटूंबाचा मुख्य व्यवसाय शेती असून, कोळी पटेल समाज मोठ्या प्रमाणात या गावात राहतो. जवळ – जवळ पूर्ण शेती कोरडवाहू अनियमित पाऊस तर कधी दुष्काळ यामुळे कृषी उत्पादनावर सतत परिणाम होतो. त्यातून जलसंधारणाच्या कामाची झालेली पडझड, पावसात होणारे सुपिक मातीचे वहन आणि जमीनीत पाणी मुरण्याची शक्यता नसलेली अवस्था अजून भर टाकते इथे नर्मदेच्या पाणी पूरवठा पाईप लाईनचा एक मात्र आधार, पण त्यातून खऱ्या अर्थाने या लोकांच्या गरजा पूर्ण होत नव्हत्या एकंदर कमी कृषिउत्पादन क्षमता असल्यामुळे पशुधना वर देखिल परिणाम झालेला. अशा अवस्थेत रोजगारासाठी हंगामी स्थलांतराशिवाय येथील लोकापुढे पर्याय नव्हता.

२०१३ मध्ये, शेतकऱ्यांच्या एकत्रीत ताकतीतून समावेशक व शाश्वत विकास शक्य आहे असे ठामपणे मत असलेल्या रिलायन्स फाऊंडेशन ने गावात प्रवेश केला. सुरूवातील एकंदर संदर्भ समजून घेण्यात वेळ गेला. गावच्या सरपंचाकडून बराच प्रतिकार अनुभवला. खऱ्या गरजू व गरीब कुटुंबाना त्यामुळे समाविष्ट करता येत नव्हते. तरी देखिल घराघरात जावून लोकाना प्रवृत्त केले गेले. विशेषत: गरिब, वंचित कूटूंबांकडे जास्त लक्ष दिले. काही दिवसानंतर लोक आपल्या समस्या व विकासा विषयी, गरजां विषयी, विकासातील त्यांच्या भूमिके बदल चर्चा करण्यासाठी एकत्र येऊ लागले. डिसे २०१३ मध्ये गावातील लोकानी कानस्लोलिया ग्राम विकास मंडळ नावाचे संघटन निर्माण केले.

पाणी – विकासाचा केंद्रबिंदू

सुरूवातीच्या सर्व चर्चेतून शेती व इतर वापरासाठी लागणारे पाणी हे शेती व शेतकऱ्याच्या विकासाठी मुख्य साधन असल्याचे प्रकर्शाने जाणवले. याचमुळे २०१४ मध्ये 'बुटा गाला' नावाचा मातीचा बंधारा बांधून पावसाचे पाणी अडविण्याचे नियोजन केले. यासाठी शक्य तेवढा पैसा व श्रम याचे लोकानी योगदान केले. एका वर्षात लोकानी परिणाम अनुभवले. बुटागाला मुळे ९०,००० घणमिटर पाणी अडवले गेले. आजूबाजूच्या १४ विहीरीच्या पाण्याची पातळी

उंचावली. त्यामुळे बाजूच्या १४ हेक्टर जमिनीवर रब्बीची पिके घेणे शक्य झाले. बुटागाला चे बांधकाम करण्याचा निर्णय प्रत्यक्ष बांधकाम व पाणी वापर इ. सर्व प्रक्रिया सर्वांच्या सहभागाने व विचाराने तसेच योगदानाने झाल्यामुळे लोकामध्ये एक आत्मविश्वास व उर्मी निर्माण झाली. कानस्लोलिया गावाच्या परिवर्तनाची सुरूवातच येथुन झाली.

ग्रामविकास मंडळाच्या सदस्यानी पाण्याचा साठा व उपलब्धतेचा आढावा घेऊन योग्य असे नियोजन बनवले व त्रुटी भरून काढल्या मग पाठोपाठ अनेक जल संधारणाचे उपक्रम हाती घेतले व गावातील केवळ ६% ओलीताखालची जमीन २६% पर्यंत वाढवली. पण त्याचवेळी उपलब्ध पाण्याचा योग्य वापर व जास्तीत जास्त परिणाम कारकता आणण्याचे प्रयत्न जाणिव पूर्णक केले गेले.भुईमूग व भाजीपाला या सारख्या पिकासाठी ठिंबक सिंचन व्यवस्थांचा पुरस्कार केला. चार वर्षाच्या कालावधीतच ठिंबक सिंचन क्षेत्र १३% वरून ३१% वर गेले. व ठिंबक वापरणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या सुद्धा १७% वरून ४१% वर वाढली. अशा कार्यक्षम पाणी वापर तंत्राचा वापर केल्यामुळे जास्त पिकांना पाणी देता आले व पाणाच्या पाळ्या देखिल जास्त देणे शक्य झाले. अगदी दुष्काळ परिस्थिती मध्ये सुद्धा विक्रमी उत्पादन घेणे या शेतकऱ्यांना शक्य झाले.

कानस्लोलिया गावातील शेतकरी जीवणभाईचे यश

कानस्लोलिया गावातील एक छोटा कापूस उत्पादन शेतकरी. वयस्कर जिवनभाईच्या कधी स्वन्पातही नव्हते कि तो आपल्या शेतात दुबार पीक घेईल. आयुष्यभर त्याने त्याच्या 20 बिगा जमिनीत केवळ 7 कींटल कापसाचे पीक घेतले. जास्तीत जास्त त्याला रू. 45000 एकून उत्पन होत असे. तो आपल्या दोन तरूण मुलासोबत 4-6 महिणे रोजगारासाठी बाहेर स्थलांतर करायचा. मातीच्या बंधाऱ्यानी त्याच्या जीवनाला कलाटनीच मिळाली. ग्राम विकास मंडळाच्या सहयोगाने त्याने आपल्या 15 बिगा जमीनीतील बांध- बंदिस्ती व खोल नांगरट केली. शाश्वत शेतीच्या पध्दती त्याने सुरू केल्या. बाजारातून महागडे मिळणारे खत पिकाला देणे बंद केले व स्वतः च्या शेतात तयार केलेले कंपोस्ट व गांडूळ खत वापरू लागला. सोबतच शेतात ठिंबक सिंचन संच बसवला. गुरे ढोरे पाळायला सुरूवात केली. आंतरपिके घेण्यास सुरूवात केली. एकात्मिक कीड नियंत्रणाचे तंत्र वापरू लागला. त्याच्यामुळे बाहेरिल रासायनिक लागड कमी झाली. पर्यायाने पर्यावरण बदलाशी सुसंगती साधली. खात्रीचे सिंचन व मातीची सुपिकता वाढली. खरीपामध्ये मूग उडीद सारखी आंतरापिके तर रब्बी मध्ये गहू, चना, जिरे यासारखी पीके घेणे सुरू झाले. पहिल्यांदाच भूईमुगाचे विकमी उत्पादन 25 किंटल इतके झाले.



पिकामध्ये भुईमुगाचा समावेश केल्यामुळे गुरासाठी चार उपलब्ध होऊ लागला.

समृध्द शिवार

पाण्याच्या उपलब्धते मुळे जमीनीची उत्पादन क्षमता वाढवण्याचे सर्व प्रयत्न केले गेले. बांध –बंदिस्ती, मिश्र पीके, गाळाची माती भरणे, शेतात तयार केलेली खते शास्वत शेतीच्या विविध तत्रांचा वापर लोकांनी वाढवला. कापूस ह्या एकमेव पिकांची जागा आता विविध पीकानी घेतली. अगोदरच्या तुलनेत २०१३ मध्ये भूईमुगाचे उत्पादन ३०% नी वाढले. कापसाचे प्रमाण ५% नी कमी झाले. भूईमुगामूळे पशुसाठी चारा मोठया प्रमाणात निर्माण झाला त्यामुळे दुभत्या जनावराची संख्या वाढली दूध उत्पादन व विक्रीमुळे कुटूंबाची आर्थिक मिळकत वाढली. एकंदर गावातील आर्थिक सामाजीक धागे दोरेच बदलले. खात्रीच्या सिंचन सोयीमुळे रब्बी मध्ये सुध्दा दोन दोन पिके घेणे शक्य झाले. त्यामुळे हंगामी स्थंलातर थांबले.

कानस्लोलिया गावातील सुमारे १६०० व आजूबाजूचे १६ शेतकरी आता आपला शेतमाल चांगल्या दराने विकण्यासाठी विविध उपाय शोधू लागले. सर्वच शेतकरी भुईमुगाच्या विक्रमी उत्पादनामुळे आनंदात होते. उत्पादनांचे भरगोष यश त्यांच्या चेहऱ्यावरून ओसंडत होत पण हया उत्पादनाला चांगला बाजार भाव मिळवणं हे सर्वासमोर आव्हान होत. सर्वजण आपला माल दलालाना विकत होते, आणि खराब माल आहे असे लेबल लाऊन दलाल अगदी पडत्या भावात माल खरेदी करत होते. शेतकऱ्याच्या हातात दुसरा मार्ग नव्हता. एकतर दलालाने दिलेल्या किमतीला माल देऊन गप्प राहणे किंवा भरमसाठ वाहतूक खर्च करून माल A.P.M.C पर्यत पाठवणे असे दोनच पर्याय होते. तरी देखिल प्रत्येक शेतकऱ्यांचा माल तुलणेने कमी असल्याने सस्त भाव मिळवण्यासाठी वाटाघाटी करणे देखिल शक्य नव्हते. यातूनच शेतकरी कंपनीची गरज समोर आली.

कमोडिटी फ्यूचर ट्रेडिंग बाबतच्या माहितीमुळे शेतकऱ्याना आपल्या शेतमालाला चांगला भाव मिळवण्याचे नविन पर्याय शोधणे शक्य झाले.

सौराष्ट्र स्व-निर्भर शेतकरी उत्पादक कंपणी उभारणी

शेतमालाला चांगली किंमत मिळावी ही सामुहिक गरज बनली व त्यामुळे शेतकरी एकत्र आले. शेतकरी उत्पादक कंपनी या संकल्पनेत बीजारोहन झाला त्यांच्या पैकी १२ शेतकऱ्यांनी देशभरात वेगवेगळया ठिकाणी जाऊन इतर शेतकरी समुहाने आपला माल कशा रितीने विक्री करतात व चांगल्या किंमती मिळाव्या म्हणून कशा वाटाघाटी करतात हे समजून घेतले. या दौऱ्याहून परत आल्यानंतर या १२ शेतकऱ्यांनी गावभर फेरी मारून सर्व शेतकऱ्याना जागृत केले. २०१६ साली या प्रयत्नातून ९९१ शेतकऱ्यानी सुमारे ११.२८ लाख रूपये शेअर भांडवल जमा केले. पहिला अनुभव घेण्यासाठी या शेतकऱ्यानी गवारच्या शेंगाची एकत्रीत विक्री केली. यातून त्याना विक्रीचे नियोजन, माल एकत्रीत करणे, बाजारातील मागणी, संभाव्य संधी, व एक कंपनी म्हणून बाजारात व्यापार करणे इ. बाबतीत चांगली शिकवण मिळाली.

या अनुभवातून व सुरूवातीच्या प्रमोटर्सनी ज्या भुमिका पार पाडल्या त्यातून दोन महिला व तीन पुरूष यांची संचालक मंडळ म्हणून नियुक्ती करण्यात आली. संचालक मंडळाने मग कंपनीची घटना लिहिली, कार्यप्रणाली ठरविली आणि मग सौराष्ट्र स्वनिर्भर शेतकरी उत्पादक कंपनी १ ऑगस्ट २०१६ रोजी S.S.F.P.C.L स्थापन केली. संचालक मंडळाने शेतकऱ्यांच्या भुईमुगाला चांगला भाव यावा म्हणून नियोजन केले यामध्ये सर्व शेतकऱ्याचा माल एकत्र करणे व शेतकऱ्याना लागवडीसाठी मदत करणे अशा प्रक्रिया आतंर्भुत होत्या. ग्रामविकास मंडळाच्या अनेक बैठका घेण्यात आल्या व त्या मधून लोकाना कंपनी, विक्री, फायदा बाबत व कंपनीचा कारभार, व्यवस्थापन इ. बाबत सातत्याने समजावून सांगीतले गेले . या दरम्यान S.S.F.P.C.L ने व्यापार लायसन मिळवले व शेतीसाठी लागणाऱ्या वस्तूंची विक्री करण्याचे एक दुकान (कृषि सेवा केंद्र) सुरू केले. गुजरात नर्मदा व्हॅली फर्टिलायझर कंपनी सोबत व्यवहार करूण शेतकऱ्यांच्या ६ टन लिबोंळी बिया चांगल्या भावात विकल्या. सोबतच जसदन A.P.M.C च्या लायसन्ससाठी बोलणी सुरू केली. अशा रितीने कंपनीचा आत्मविश्वास वाढवणारा व शेतकऱ्यांच्या शेत मालाला न्यायभाव, पारदर्शी व्यवहारातून मिळवून देण्याचा कंपनीचा प्रवास सुरू झाला.

क्षितीज विस्तार


कंपनीने भूईमुगाच्या मालाचे एकत्रीकरण व विक्री हा उपक्रम ठरवल्यामुळे स्थायीक प्रशासनाच्या वा लोप्रतिनिधीच्या मदतीने नांफेड (National Agriculture marketing federation of India) चे खरेदी केंद्र गावात सुरू करण्याचे प्रयत्न केले. नाफेड केवळ सहकारी संस्था सोबत व्यवहार करणे म्हणून S.S.F.P.C.L ने गुजरात ॲग्री बीझनेस कन्सोरशियम प्रोड्युसर कंपनी लि. सोबत पाटर्नरशीप करार केला.त्यामध्ये S.S.F.P.C.L ची प्रमुख भूमिका माल एकत्र करणे व वाटप करणे ही ठेवली याच दरम्यान गुजरात सरकारने भूईमूग खरेदी किमान आधारभूत किमतीच्या दरात गुजरात को ऑपरेटीव्ह कॉटन फेडरेशन लि. या राज्य पातळीवरील फेडरेशन मार्फत करण्याचे जाहिर केले. या संधीचा फायदा घेण्यासाठी SSFPCL ने GUJCOT सोबत संधान बांधले. परिणामी राज्य पातळीवरील GUJCOT GUJPRO सारख्या एजन्सी सोबत SSFPCL ही त्यांच्या तीन खरेदी केंद्रासाठी नोडल एजन्सी बनली. हा व्यवहार पुढिल प्रमाणे घडला.

सुमारे १६८ गावातील ५७८६ भूईमुग उत्पादक शेतकऱ्यापर्यंत पोहोचून सुमारे ५४ कोटी रूपयेचा व्यवहार केला. साधारणतः प्रतिकिंटल भुईमुगाचा भाव ३५००/- वरून ४५००/- पर्यंत वाढीव मिळवला. या शिवाय शेतकऱ्यांना त्यांचा माल खरेदी केंद्रा पर्यंत आणण्यासाठीच्या वाहतूक खर्चामध्ये देखील मदत केली गेली. शेतकऱ्यांच्या मालाची रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यामध्ये जमा झाल्यामुळे सर्व काही सुलभ व पारदर्शी झाले.

ह्या कंपनीची खाशियत म्हणजे गाव पातळीवरील संघटन व राज्य पातळीवरील संस्थासोबत शेतकऱ्यांना किमान आधारभूत किमत (M.S.P) मिळवून देण्याचे प्रयत्न, SSFPCLकंपनी शेअर होल्डर्स पैकी एक श्री छगनभाई मेटालिया म्हणतात. *"सुरवातीला मी या कंपनी सोबत जुळायला तयार नव्हतो. कारण माझी धंदा करण्याची पध्दत व कंपणीची पध्दत मिळती जुळती असेल की नाही याबाबत मला शंका होती. पण मी मनात निश्चय केला आणि आता इतर गावातील शेतकरी सुध्दा ह्या कंपनी सोबत एवढा मोठा व्यवहार करतात हे पाहून मात्र खात्रीच पटली. अशा कंपनीचा भागधारक असल्याचा मला अभिमान वाटतोय. ही कंपनी शेतकऱ्याचा माल चांगल्या भावात विक्री करून देते आहे. प्रत्येक शेतकऱ्याला यामुळे सुमारे ९०,०००रूपये जास्तीचे मिळाले याला चमत्कारच म्हणावे लागेल"* केवळ दोन वर्षामध्ये एकत्रीत माल विक्री व बियाणे, खते, सिंचन, साहित्य, तसेच माती परिक्षण इ. सुविधा उपलब्ध करून देऊन SSFPCL ने कानस्लोहिया गावातील ६६ शेतकऱ्याचा दोन लाख रूपये पेक्षा जास्त वाढीव नफा करून दिला. त्या शिवाय खरेदी केंद्रात काम केलेल्या ६ शेतकऱ्यांना त्यांचा मेहणताना म्हणून सुमारे ५६००० रूपये मिळाले. या सगळयाचे परिणाम असे दिसायला लागले की गावात मोटर पंप, विद्युतकरण, विहीर खोलीकरण, ठिंबक सिंचन व्यवस्था, पाईप लाईन्स, पक्की घरे, गुरे ढोरे याचे प्रमाण वाढायला लागले. कानस्लोलिया गावातील ग्राम विकास मंडळाने ग्रामपंचायत सोबत राहून समग्र ग्राम विकासाकडे आगेकुच सुरू केली. कानस्लोलिया गावा प्रमाणेच रिलायन्स फाऊंन्डेशन देशातील १२ राज्यातल्या ५५० गावामध्ये सुमारे ६०,००० कुटुंबासोबत काम करीत आहे. स्थानिकाच्या सहभागातून अशा प्रक्रिया निर्मीत करण्याच्या रणनितीमुळे एवढ्या मोठया प्रक्रियेची फळे अगदी एक

एक शेतकरी कुटूंबाला मिळत आहेत. आज SSFPCL सारख्या १९ शेतकरी उत्पादन कंपन्या रिलायन्स फाऊंडेशनच्या मदतीमुळे उभ्या राहिल्या आहेत. देशाच्या १० राज्यात त्या वसल्या आहेत. या सर्व कंपन्या मिळून ५०० गावातील ३५००० शेतकऱ्याना फायदा मिळवून देत आहेत. यांचे भाग भांडवल रू २२८ लाख रूपये आहे. कि जे सर्वसामान्य लहान शेतकऱ्यांचे आहे. कमोडिटी फ्यूचर ट्रेडिंगच्या अभ्यासामुळे आपल्या शेतमालाला चांगली किंमत मिळावी यासाठी शेतकऱ्यांना नवे तंत्र उमगले आहे.

विपणन साखळी



शेतमालाला वाढीव किंमत मिळवण्या सोबतच FPCG शेतकरी उत्पादक कंपण्या विविध विभाग, केंद्र, संस्था ह्यांच्या सहकार्याने शेतकऱ्यांना मातीचे आरोग्य, बियाने, किंमतीचा कल साठवणूक इत्यादी बद्दल देखिल मदत करतात. ह्यामुळे शेतकऱ्यांची उदयोगाची क्षमता पुढे आली. काढणी पश्चात नुकसान कमी होत आहे व त्यांच्या उत्पन्नाची शास्वती मिळाली आहे.



गावाच्या आजूबाजूलाच खरेदी केंद्र झाल्यामुळे भुईमुग विकणाऱ्या शेतकऱ्यांना मार्केटींग खूप सोपे व सुविधा जनक झाले.

निष्कर्ष

शेतकऱ्याला कृषि लागती पासून ते थेट बाजार पेठे पर्यत फायदेशीर भूमिका निभावण्या इतपत सक्षम बनवले तर आपल्या देशातील कृषी व कृषक यांचा चेहराच बदलून जाईल. रिलायन्स फौडेशनच्या प्रयत्नामुळे कानस्लोलिया गावाचे झालेले परिवर्तन खात्रीच्या सिंचन व्यवस्थेमुळे व शास्वत पध्दतीची शेती करण्यामुळे जीवनभाईच्या पल्लवित झालेल्या आशा किंवा उत्पादन आणि मार्केटींग चे अधिकार उत्पादक कंपनी तर्फे शेतकऱ्याच्या हातात येणे ही त्याची ज्वलंत उदाहरणे आहेत. उत्पादक कंपन्या मार्फत बाजारात थेट घुसण्याची ताकत शेतकऱ्यांना मिळाली त्यामुळे त्यांच्यामध्ये स्वावलंबित्व निर्माण झाले. बाजाराच्या चढ-उत्तराचा त्याना धोका राहिला नाही विश्वास वाढला. त्यांच्या अंगी विविध कौशल्ये विकसित झाली.

Jasbir Sandhu
Reliance Foundation
Project Office, First Floor,
Thane-Belapur Road, Ghansoli,
Navi Mumbai-400701
Email : jasbir.sandhu@reliancefoundation.org

मराठी अनुवाद - श्री. लक्ष्मीकांत पडोळे, निम फाऊंडेशन

Source : *Power of Collective, LEISA India, March 2018*